पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – ७३**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २५/०७/२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २५/०७/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.गावडे राजेंद्र तानाजी
६. मा.आंगोळकर सागर सुनिल
७. मा.करुणा शेखर चिंचवडे
८. मा.लोंढे नम्रता योगेश
९. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०. मा.गीता सुशिल मंचरकर
११. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१२. मा.लांडगे सारिका संतोष
१३. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५. मा.बारणे अर्चना तानाजी
१६. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१) मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.पाटील, मा.तुपे, मा.पठाण – सह शहर

अभियंता, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.खोत, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत - सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक) मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.घोडे, मा.कांबळे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.पवार, मा.सुपेकर, मा.देशमुख - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट – प्रशा.अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.माने – पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने "ऑफिसर ऑफ दि मन्थ" मा.लोणकर, प्र.सहा. आयुक्त यांना घोषित केलेबद्दल मा.स्थायी समितीच्या वतीने पुस्तक देणेत येवून त्यांचा सत्कार करण्यात आला.)

-----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३५) जलशुध्दीकरण केंद्र से.क्र.२३ येथे टप्पा क्र.१ व २ पाणी शुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या द्रवरूप पॉली अल्युमिनियम क्लोराईड खरेदीबाबत.

विषय क्र.३६) वायरलेस लायसन्सबाबत.

विषय क्र.३७) मा.महापौर यांच्या इंदोर दौ-याच्या झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत – मा.विकास डोळस, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३८) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्वाच्या खर्चाबाबत– मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) क्रांतीवीर चापेकर राष्ट्रीय संग्रहालय भुमीपुजन समारंभाच्या खर्चाबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४०) मुख्य आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे सर्व आर्थिक व प्री-बीडचे अधिकार काढणेबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक ११/०७/२०१८, दि.१८/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७१)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १८/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ७२)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) **मा.राजेंद्र गावडे** - कार्यपत्रिका क्र.७० दि.०४/७/२०१८, दि.११/७/२०१८ व दि.१८/७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करतांना विषय क्र.४ मध्ये विषय **"दफ्तरी दाखल करण्यात येत आहे."** हा मजकूर वगळून त्याऐवजी **"मा.आयुक्त यांना सदर विषय मागे घेण्यास परवानगी देण्यात येत आहे".** अशी दुरूस्ती करून त्यानंतर **"मा.आयुक्त यांनी सदरचा विषय तपासून फेरसादर करावा या प्रमाणे समितीच्या निर्देशासह"** सभावृत्तांत दुरूस्त करून मान्यता देणेत यावी.

**मा.सभापती** - कार्यपत्रिका क्र.७० दि.०४/७/२०१८, दि.११/७/२०१८ व दि.१८/७/२०१८ मधील विषय क्र.४ मध्ये **"विषय दफ्तरी दाखल करण्यात येत आहे".** हा मजकूर वगळून त्याऐवजी **"मा.आयुक्त यांना सदर विषय मागे घेण्यास परवानगी देण्यात येत आहे."** अशी दुरूस्ती करून त्यानंतर **"मा.आयुक्त यांनी सदरचा विषय तपासून फेरसादर करावा या प्रमाणे समितीच्या निर्देशासह"** दि.०४/०७/२०१८, दि.११/७/२०१८ व दि.१८/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.७०)** चा सभावृत्तांत दुरूस्तीसह कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -२९६२ विषय क्रमांक - ०१
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यलय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/क-मुख्य/१२७/२०१८ दि.०७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५/१/२०१८-१९ अन्वये मौजे भोसरी कासारवाडी येथील आरक्षण क्र.१३ विकसित करणेकामी मे.बी.के.खोसे नि.र.रू.१२,६४,८०.९६४/- (अक्षरी र.रु.बारा कोटी चौसष्ठ लाख ऐंशी हजार नऊशे चौसष्ठ फक्त) पेक्षा ६.७५% जादा दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा

२.८९% कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.१३,५०,१८,४२९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९६३ विषय क्रमांक - ०२

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – ड क्षेत्रिय, जलनि:सारण

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.डक्षेका/जनि/कावि/१४१/२०१८ दि.०४/०७/२०१८

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे या कामास मुदतवाढ मिळणेबाबत.

मा.सह शहर अभियंता यांचेकडील क्र.डक्षे/जनि/drainage/१०४/२०१८ दि. २५/७/२०१८ चे पत्रातील मा.सह शहर अभियंता यांचे मागणीनुसार विषय क्र.२ वरील विषरपत्र मागे घेणेस त्यांना अनुमती देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९६४ विषय क्रमांक - ०३

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग– बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बीपी/०५/कावि/२१५/२०१८ दि.१०/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड म.न.पा.कार्यक्षेत्रातील रस्ता/फुटपाथ, मनपाच्या सार्वजनिक मोकळ्या जागेवरील अतिक्रमण काढणेकामी अ, ब, क, ड, ई, फ, ग व ह या क्षेत्रीय कार्यालयातील अतिक्रमण विभाग निरस्त करून बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन विभाग स्थापन करणेत आले आहे. सदर अतिक्रमण विभागाचे वतीने अनाधिकृत/विनापरवाना हातगाडया/टप-यांवर एकत्रीत कारवाई मोहीम राबविण्यात येते. कारवाईत जप्त केलेले साहित्य वरिष्ठाच्या सूचनेनुसार नेहरूनगर गोडाऊन येथे एकत्रीतरित्या जमा करणेत येते. काही व्यावसायिकांनी हातगाडया/टप-या व जप्त केलेले साहित्य परत मिळणेकामी अर्ज या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत. तथापि, सदर व्यावसायिक पुन्हा आपल्या मुळ जागेवर जावून

व्यवसाय करण्याची शक्यता असून त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. तसेच सदर प्रशासकीय शुल्क कारवाईच्या खर्चाच्या मानाने अंत्यत कमी आहे. सदर अतिक्रमण बाबत वारंवार नागरिकांच्या तक्रारी सारथी व आपल्या सरकार व लेखी अर्जाद्वारे येत आहेत. सबब सदर व्यावसयिकांना त्यांचे साहित्य परत देण्याचे दर सुधारित करणे आवश्यक आहे. अतिक्रमण करणारे विरुध्द कारवाई करणेसाठी मनपाचा येणारा खर्च पाहता खालील प्रमाणे प्रशासकीय शुल्क वसूल करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रशासकीय शुल्क वसुलीबाबतचा तपशिल कोणत्या गोष्टीकरीता वसुल करावायाचा | सुधारित प्रस्तावित प्रशासकीय शुल्क रुपये | तरतुद |
|---|---|---|---|
| १ | हातगाडी,पथारी यांचे रस्त्यावरील अतिक्रमण | ६४००-/ | महाराष्ट्र प्रातिंक महानगरपालिका अधिनियम कलम २३०,२३१ तसेच कलम ४३८(२)(१) नुसार(३) |
| २ | टपरी स्थिर फेरीवाले यांचे अतिक्रमण | १२८००/- हातगाडी/टपरी इ. | |
| ३ | हातगाडी/टपरी येथील किरकोळ साधने/ वजनकाटा /मापे जप्त केली असल्यास ती सोडविण्याकरिता शुल्क /आकार | २५००-/ | |
| ४ | महापालिका परिसरात फळविक्री/ भाजीपाला/ चिकन विक्री व इतर व्यवसाय करणेसाठी वाहनाचा वापर करणारे व्यावसायिक/ वाहनचालक यांचेकडुन शुल्क आकार | ३८४००-/ | |

तरी वरीलप्रमाणे प्रशासकीय शुल्क वसूल करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील परवानाधारक व्यावसायिकांना प्रस्तावित दराच्या ५०% दराने पहिल्यावेळी शुल्क आकारण्यात यावे. सदर परवानाधारक पुन्हा चुकीच्या ठिकाणी आढळल्यास प्रस्तवित दराने प्रशासकिय शुल्क आकारणेत यावे व परवाना नसलेल्या व्यावसायिकांना प्रस्तावित दराने शुल्क आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९६५ विषय क्रमांक - ०४

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – नागरी सुविधा केंद्र

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नासुकें/०२/कावि/२४७/२०१८ दि.१०/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचार घेवून –

तिस-या टप्प्यामध्ये खाजगी तत्वावर नागरी सुविधाकेंद्र चालक नियुक्त करणेकामी ९५ अर्जदारांपैकी अंतिम पात्र ठरलेल्या एकूण २५ अर्जदारांची नागरी सुविधा केंद्र चालक म्हणून नियुक्त करणेकामी महापालिका कार्यक्षेत्रामध्ये एकूण २९ प्रभागांकरिता नागरी सुविधा केंद्र चालक

नियुक्त करणेकरिता अंतिम पात्र झालेल्या अर्जदारांना महानगरपालिका RFP मधील अटी/शर्ती नुसार प्रती सेवा र.रू.२०/- नगरिकांकडून स्विकारणेत येवून त्यापैकी र.रू.५/- पालिकेस प्राप्त होणार आहे. तसेच मिळकतकर, पाणी पट्टी इ. बीलासाठी स्विकृत होणारे भरणा पावती प्रती पावती र.रू.५/- याप्रमाणे महापालिकेमार्फत अदा करणेस प्रथम ३ वर्ष करारनामा करून खाजगी तत्वावर प्रस्तावात नमूद प्रमाणे नागरी सुविधा केंद्र चालक नियुक्ती करणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.१८ हा दाट लेकसंख्या व क्षेत्रफळा नुसार वाढत असून पिंपरी चिंचवड बस स्टेशन जवळ असेलने नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात रहिवासी आहे, नागरी सुविधा केंद्र तिसरा टप्पा प्रभाग क्र.१८ मध्ये नविन नागरी सुविधा केंद्राची आवश्यकता एक असून प्रथम कागदपत्रांच्या छाननी मध्ये प्राप्त तीन अर्जदारांपैकी दोन अर्जदार १) श्रीम.सारिका रविंद्र कुलकर्णी २) श्री.संभाजी ज्ञानेश्वर शेडगे हे पात्र ठरले होते. परंतु लॉटरी पध्दती मध्ये श्री.संभाजी ज्ञानेश्वर शेडगे हे अपात्र ठरलेले आहेत. तथापि, सदर प्रभागासाठी तीन केंद्र मंजूर असून पहिल्या व दुसऱ्या टप्प्यामध्ये दोन केंद्र कार्यरत आहे. तरी, सध्यस्थितीत नागरिकांचा विचार होऊन सदर प्रभागामध्ये चार केंद्र आवश्यक आहे. सबब, प्रभाग क्र.१८ मध्ये लोकसंख्या व क्षेत्राचा विचार करून तीन केंद्र ऐवजी चार केंद्रांना मान्यता देणेत येत आहे व अर्जदार श्री.संभाजी ज्ञानेश्वर शेडगे यांचा अर्ज पात्र करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.०७ हा दाट लेकसंख्या व क्षेत्रफळा नुसार वाढत असून सदर प्रभागामध्ये नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात रहिवासी आहे, नागरी सुविधा केंद्र तिसरा टप्पा प्रभाग क्र.०७ मध्ये नवीन नागरी सुविधा केंद्राची आवश्यकता एक असून प्रथम कागदपत्रांच्या छाननी मध्ये प्राप्त तीन अर्जदारांपैकी दोन अर्जदार १) श्री.अनिल बबन लांडगे २) श्री.वैभव दत्तात्रय ताव्हरे हे पात्र ठरले होते. परंतु बांधकाम विभागाच्या स्थळ पाहणी अहवालानुसार श्री.अनिल बबन लांडगे यांचा अर्ज अनधिकृत बांधकाम या कारणास्तव अपात्र ठरला आहे. तथापि, सदर प्रभागासाठी तीन केंद्र मंजूर असून पहिल्या व दुसऱ्या टप्प्यामध्ये दोन केंद्र कार्यरत आहे. तरी, सध्यस्थितीत नागरिकांचा विचार होऊन सदर प्रभागामध्ये चार केंद्र आवश्यक आहे. सबब, प्रभाग क्र.०७ मध्ये लोकसंख्या व क्षेत्राचा विचार करून तीन केंद्र ऐवजी चार केंद्रांना मान्यता देणेत येत आहे व अर्जदार श्री.अनिल बबन लांडगे यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पुन्श्च तपासणी करून बांधकाम विभागाचा अभिप्राय घेऊन मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९६६ विषय क्रमांक - ०५
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/०६/कावि/११७/२०१८ दि.१६/०७/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२५/०६/२०१८ ते दि.०१/०७/२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११७/२०१८ दि.१६/०७/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९६७ विषय क्रमांक - ०६
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.सारिका लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विमुका/८/कावि/३२१/२०१८ दि.१६/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील B-2 नि.नो.क्र.३३/१/२०१७-१८ मधील औंध रावेत रस्त्यावरील साई चौक येथील पुलास बाधा करणारी अती उच्चदाब (132KV) विजवाहिनी हलविणेकामी मे.कोंकण मेलॅबल इंडास्ट्रिस (B-2) नि.र.रू.७,११,००,०००/- (अक्षरी र.रू.सात कोटी अकरा लाख फक्त) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९६८ विषय क्रमांक - ०७
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – स्थापत्य ह मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/१२८/२०१८ दि.१६/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग ह मुख्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९६९ विषय क्रमांक - ०८
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय
सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/ड-मुख्य/कावि/१५०/२०१८ दि.१६/०७/२०१८
मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१००/१/२०१७-१८ अन्वये प्रभाग क्र.४८ येथील विमल गार्डन ते नढेनगर पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करणेकामी मे.पी.सी.सी.इन्फ्रा. प्रा.लि. नि.र.रू.४,०१,३४,३४१/- (अक्षरी र.रु.चार कोटी एक लाख चौतीस हजार तिनशे एक्केचाळीस फक्त) पेक्षा ६.१% कमी दराने प्राप्त झालेली आहे. सन २०१७-१८ चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा १३.४०% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.३,७६,८६,१४६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७० विषय क्रमांक - ०९
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड
संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे जा.क्र.स्था/नि/इ-मुख्य/१७३/२०१८ दि.१७/०७/२०१८
मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१०५-३-२०१७-१८ अन्वये प्रभाग क्र.७ येथील चोविसावाडी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.बहिरट ब्रदर्स नि.र.रू.७६,६५,५७४/- (अक्षरी र.रु.शहात्तर लाख पासष्ठ हजार पाचशे चौ-याहत्तर फक्त) पेक्षा २३.५१% कमी दराने प्राप्त झालेली असल्याने, प्राप्त निविदा मंजूर दराने र.रू.५८,६३,३९८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलम लागु असल्यास, मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७१ विषय क्रमांक - १०
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे जा.क्र.स्था/नि/ब-मुख्य/३८९/२०१८ दि.१७/०७/२०१८
मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१२२/५/२०१७-१८ अन्वये प्र.क्र.१९ वाल्हेकरवाडी प्रेरण शाळा व चिंतामणी चौक परिसरात डांबरीकरण करणेकामी मे.बहिरट ब्रदर्स नि.र.रू.६३,२०,११७/- (अक्षरी र.रु.त्रेसष्ठ लाख वीस हजार एकशे सतरा फक्त) पेक्षा १४.१५% कमी र.रू.५४.२५.८२०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७२ विषय क्रमांक - ११
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – इ क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे जा.क्र.इ/स्था/कावि/२/६४३/२०१८ दि.१६/०७/२०१८
मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार नेमणुकीबाबतच्या समितीची बैठक दि.०४/०६/२०१८ रोजी मा.शहर अभियंता यांच्या कार्यालयात झालेली आहे. सदर बैठकीमध्ये मे.शिल्पी आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांनी प्रभाग क्र.३ च-होली येथील स्मशानभुमी विकसीत करणे (टप्पा २) कामाचे सादरीकरण केलेले आहे. सदर सादरीकरण समाधानकारक असल्याने छाननी समितीने त्यास मान्यता देवुन स्वीकारण्यात आलेले आहे. सबब सदर कामास सल्लागार म्हणुन मे.शिल्पी आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सल्लागार म्हणुन करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामांचे पुर्वगणकपत्र तयार करणे व निविदा बनविणे तसेच कामांवर देखरेख करणे इ. निविदा पुर्व (Pre tender) निविदा पश्चात (Post Pretender) इ. कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन मे. शिल्पी आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांची नियुक्ती केलेली आहे. मे. शिल्पी आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे यशस्वी रित्या पुर्ण केलेली आहे. व सध्या देखील चालु आहेत. मे. शिल्पी आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांना रस्ते महामार्गाचे सविस्तर प्रकल्प तयार करणेचाही अनुभव आहे. मनपाच्या स्थायी समिती ठराव क्र.२१३९ दि.७/२/२०१८ अन्वये केलेल्या Empanelment मध्ये मे. शिल्पी आर्किटेक्टस् अँण्ड

प्लॅनर्स यांचा समावेश आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता विषयांकित नमुद केलेल्या कामासाठी मे. शिल्पी आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करण्याचा प्रस्ताव तसेच निविदा पुर्व (Pre tender) व निविदा पश्चात (Post tender) कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व मनपाचे प्रचलित दरानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७३ विषय क्रमांक - १२

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.सहा. आयुक्त(भांडार) यांचे जा.क्र.मभां/०४/कावि/५२७/२०१८ दि.१७/०७/२०१८

मा.सहा. आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपा गणवेश देय कर्मचा-यांसाठी पावसाळी साधने गमबुट खरेदी करणेकामी ई नि.सु.क्र.११/२०१८-१९ अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन तीन निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.गोल्ड पिलर असोसिएटस, चिंचवड यांचे गमबुट प्रती जोड र.रु.७३९/- नुसार २७२२ जोड साठी एकुण र.रु.२०,११,५५८/- (अक्षरी र.रु.वीस लाख अकरा हजार पाचशे अठठावन्न फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७४ विषय क्रमांक - १३

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/०६/कावि/१२०/२०१८ दि.१७/०७/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे जून २०१८ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१२०/२०१८ दि.१७.०७.२०१८ अन्वये पाठविलेला अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७५ विषय क्रमांक - १४

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – ड क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता (वि) यांचे जा.क्र.डक्षेका/०३/कावि/४२२/२०१८ दि.१६/०७/२०१८

मा.कार्यकारी अभियंता (वि) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते २) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७६ विषय क्रमांक - १५

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – शिक्षण मंडळ कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.शिमं/०९/कावि/१२८/२०१८ दि.१७/०७/२०१८

विषय – शिक्षण मंडळाकडील प्राथमिक शाळांमध्ये केयान मशिन देखभाल दुरुस्ती व इ.१ ली ते ७ वी चा अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेकामी होणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.१५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७७ विषय क्रमांक - १६

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – जलनि:सारण

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/०२/कावि/१०८६/२०१८ दि.१७/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.२०/२/२०१७-१८ अन्वये सल्लागाराने सुचविलेल्या सर्वेक्षणानुसार प्रभाग क्र.२४ थेरगाव येथील वनदेवनगर, आनंद हॉस्पीटल परिसर, बेलठिकानगर व इतर परिसरातील जलनिःसारण विषयक सुधारणा कामे करणे व उर्वरीत ठिकाणी जलनिःसारण नलिका टाकणेकामी M/s. CHOTELAL CHAUHAN यांनी नि.र.रू.९३,३७,०५८/- (अक्षरी र.रू.त्र्याण्णव लाख सदोतीस हजार अठठावण्ण फक्त) पेक्षा १९.१९% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.७५,४५,२७७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट

कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७८ विषय क्रमांक - १७

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/०६/कावि/५१/२०१८ दि.१८/०७/२०१८

विषय - नि.नो.क्र.२६/१/२०१७-१८ चे कामाचा करारनामा करणेस मंजूरी मिळणेबाबत.

विषय क्र.१७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९७९ विषय क्रमांक - १८

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.पापु/०६/कावि/५०/२०१८ दि.१८/०७/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ७) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८० विषय क्रमांक - १९

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा. शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/अ-मुख्य/११/२०१८ दि.१७/०७/२०१८

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५५/१२/२०१६-१७ प्रभाग क्र.९ शाहूनगर येथील के.एस.बी.चौक ते नंदिनी हॉटेल पर्यत सव्हिस रोडचे डांबरीकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया नि.र.रू.२८,००,६९४/-(अक्षरी र.रू.अठ्ठावीस लाख सहाशे चौ-यान्नव फक्त)

पेक्षा ६.१०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२६,२९,८५२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८१ विषय क्रमांक - २०

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – नागरवस्ती विकास योजना

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/१/कावि/३२७/२०१८ दि.१९/०७/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागा मार्फत विविध कल्याणकारी योजना राबविणेत येतात. या योजनांची वस्ती पातळीवर प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी, MSW अर्हता प्राप्त ११ समुह संघटकांची तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीसाठी मानधन तत्वावर नेमणूक करणेत आली आहे. त्यापैकी ६ समुह संघटकांची तात्पुरत्या स्वरूपात केलेली नेमणूकीची मुदत दिनांक १३/७/२०१८ रोजी संपत असल्याने आदेशाचे तारखेपासुन अथवा प्रत्यक्ष रूजू तारखेपासून ६ महिने कालावधीसाठी प्रस्तावात नमूद केलेल्या ६ समुह संघटकांना मुदत वाढ देणेस व त्यांना प्रत्येकी र.रु.१५,०००/- + वाहतूक भत्ता र.रु.१,३००/- असे एकूण र.रु.१६,३००/- मासिक एकवट मानधन देणेस तसेच त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८२ विषय क्रमांक - २१

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – अ क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा. क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.अक्षेका/आ/२/कावि/३६७/२०१८ दि.१८/०७/२०१८

मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रिय कार्यालय आरोग्य विभागाचे निविदा कामाचे सोबतचे प्रपत्र अ मधील नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे एकच निवदा प्राप्त झाली असल्याने त्या दराने (१६.५३% जादा) स्विकारण्यात आलेल्या मंजूर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचे पत्र देणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८३ विषय क्रमांक - २२
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/६/कावि/३१२/२०१८ दि.१९/०७/२०१८

विषय - मनपाचे विद्युत विभागासाठी विविध ट्युबलर व ऑक्टोगोनल पोल साहित्य खरेदीबाबत.

विषय क्र.२२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८४ विषय क्रमांक - २३
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.फक्षेका/आ/२/कावि/४९७/२०१८ दि.१२/०७/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागा मार्फत पावसाळी गटर्स चेंबर्स साफसफाई करणे व निघणारा गाळ, कचरा, राडारोडा, झाडेझुडपे इ. वाहतुक करणेकामी प्राप्त अंदाजपत्रकीय र.रु.५,३७,३७२/- पेक्षा ३८% कमी र.रु.३,३३,१७१/- दराची निविदा स्विकारणेत आली असून मंजूर दराने ठेकेदारास करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८५ विषय क्रमांक - २४
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ – मा. अति. आयुक्त यांचे जा.क्र.स्था/उद्यान/कावि/२५२/२०१८ दि.१९/०७/२०१८

मा. अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७६/०२/२०१७-१८ मधील काम क्र.२ अन्वये, चिखली मैलाशुध्दीकरण केंद्राचे उर्वरित जागेत आकर्षक लँडस्केपिंग विकसित करणेकामी मे.एच.सी.कटारिया निविदा र.रु.४,६३,०९,२३२/-(अक्षरी र.रू.चार कोटी त्रेसष्ठ लाख नऊ हजार दोनशे बत्तीस फक्त) पेक्षा १४.००% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३,९८,२५,९४०/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील

या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८६ विषय क्रमांक - २५

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/०६/कावि/८३५८/२०१८ दि.१९/०७/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग यांनी दि.२७/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१८-१९ अंदाजपत्रकातील भाग तीन मधील ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर जमा व खर्च र.रु.२,१८,७००/- वाढ करणेबाबत प्रस्तावीत केले आहे. ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर भाग - ३ मधील सन २०१५-१६ - ४,५४,८००/-, सन २०१६-१७ - ४,४०,२००/- सन २०१७-१८ - ९,३०,७००/- खर्च झालेला आहे. ध्वजदिन निधी या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात र.रु.१०,००,०००/- तरतूद करण्यात आलेली असून र.रु.९,२१,१००/- खर्च झालेला आहे व र.रु.७८,९००/- शिल्लक आहेत. प्रशासन अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग यांचे ध्वजदिन निधी वजातीचे बील र.रु.२,१८,७००/- रकमेचे आहे. सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- भाग - ३ जमा व खर्चात तरतूद वाढविणे आवश्यक असलेने मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे पाठविणेकामी शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८७ विषय क्रमांक - २६

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – लेखा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/०६/कावि/८३५६/२०१८ दि.१९/०७/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सहा.आयुक्त मध्यवर्ती भांडार विभाग यांनी दि.२१/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकात "लिनन खरेदी" या लेखाशिर्षावर सुधारीत तरतुद रु.५० लाख करण्यात आली होती. तथापि सदर तरतूदी मधुन खर्च न झालेने सदर तरतुद व्यपगत झाली आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी सदर लेखाशिर्षावर र.रु.४०,००,०००/- तरतुद करण्यात आली असून मागिल आर्थिक वर्षातील बिले र.रु.३२.६२ लाख अदायगीसाठी सदर तरतूद खर्च झालेने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात विविध विभागांसाठी लिनन साहित्य खरेदीकामी पुरेशी तरतूद शिल्लक नाही. त्यामुळे विविध विभागांचे साहित्य खरेदी कामी र.रु.१ कोटी जादा तरतूद आवश्यक आहे. तसेच छपाई या लेखाशिर्षावर १.७५ कोटी तरतूद करण्यात आलेली

आहे. तथापि विविध विभागाचे छपाईची मागणी वाढल्याने र.रु.५० लाखजादा तरतूद आवश्यक आहे. "विद्युत साहित्य खरेदी" या लेखाशिर्षातून र.रु.१ कोटी ५० लाख वर्गीकरणास सह शहर अभियंता विद्युत यांनी मान्यता दिलेली आहे. तरी र.रु.१.५० कोटी वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८८ विषय क्रमांक - २७

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे जा.क्र.मातंवि/१२/कावि/८४/२०१८ दि.२०/०७/२०१८

मा. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

निविदा सूचना क्रमांक २/२०१८-१९ नुसार लघुत्तम निविदाधारक मे.मेनस्ट्रीम सोल्युशन्स यांना महानगरपालिका मुख्य कार्यालय व इतर विविध कार्यालयातील संगणकीय केबल नेटवर्क करणेबाबत कामकाज दोन वर्षकालावधी करीता देण्यास तसेच त्यांचे सोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या एकूण र.रू.१७,१८,४१०/- (अक्षरी र.रू.सतरा लाख आठरा हजार चारशे दहा फक्त) अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.००% ने कमी चे दरास व त्या अनुशंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९८९ विषय क्रमांक - २८

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे जा.क्र.मातंवि/११/कावि/४६९/२०१८ दि.२०/०७/२०१८

मा. मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

निविदा सूचना क्रमांक १५/२०१७-१८ नुसार लघुत्तम निविदा धारक मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि. यांना ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत विकसित करणेत आलेल्या नऊ संगणक प्रणालींची देखभाल दुरूस्तीकामी १ वर्ष कालावधी करीता मनुष्यबळ उपलब्ध करणेचे कामकाज देण्यास तसेच त्यांचे सोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या र.रू.१३,०८,०००/- अधिक वस्तु व सेवाकर १८% र.रु.२,३५,४४०/- असे एकुण र.रू.१५,४३,४४०/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख त्रेचाळीस हजार चारशे चाळीस फक्त) अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.७९% ने कमी चे दरास व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९० विषय क्रमांक - २९

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – फ क्षेत्रीय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.फक्षेका/आ/२/कावि/५२३/२०१८ दि.२१/०७/२०१८

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागाचे कामाकरिता अ क्षेत्रीय कार्यालयाकडील निविदा मंजुर दर र.रु.३,३००/- अन्वये ६० नग पोर्टेबल टॉयलेट पुरवणेकामी मे. सिक्युअर आयटी फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि. यांना आदेश देण्यात आला असुन ठेकेदारास करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला आहे. सदर कामासाठीचा अपेक्षीत खर्च र.रु.१,९८,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख अठ्याण्णव हजार फक्त) असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९१ विषय क्रमांक - ३०

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – नगरसचिव

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा. नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/६४३/२०१८ दि.२१/०७/२०१८

मा. नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूदप्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९२ विषय क्रमांक - ३१

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – उद्यान

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा. अति. आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/६/कावि/३४२/२०१८ दि.१७/०७/२०१८

मा. अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/०७/२०१८-१९ अन्वये टाटा मोटर्स रस्ता (त्रीवेणीनगर चौक ते नाशिक रोड भोसरी) सुशोभिकरण देखभाल करणेकामी मे. कृषितेज

डेव्हलपर्स या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा रक्कम रुपये ८९,५३,०००/- (अक्षरी र.रू.एकोणनव्वद लाख त्रेपन्न हजार फक्त) पेक्षा १५.०% टक्के कमी रक्कम रुपये ७६,१०,०५०/- दराने स्विकृत करणेत आली असुन प्रस्तुतकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्रं. ०१/०७/२०१८-१९ अन्वये टाटा मोटर्स रस्ता (त्रीवेणीनगर चौक ते नाशिक रोड भोसरी) सुशोभिकरण देखभाल करणेकामी मैं.कृषितेज डेव्हलपर्स या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा र.रू.८९,५३,०००/- (अक्षरी र.रू. एकोणनव्वद लाख त्रेपन्न हजार फक्त) पेक्षा १५.०५% कमी र.रू.७६,१०,०५०/- दराने स्विकृत करणेत आली असून सदर काम सुरू करणे आगोदर व काम पुर्णत्व झाल्यावर (Before/After) प्रत्येक कामाचे तंतोतंत (Same To Same) फोटो व पुर्ण चलचित्र (Video) काढणेची अट काराराननामा व कामाच्या आदेशामध्ये टाकून त्याप्रमाणे त्यांची करारनामा करून घेणेस व प्रस्तुतकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९३ विषय क्रमांक - ३२

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – उद्यान

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/२/कावि/३५३/२०१८ दि.२१/०७/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/९/२०१८-१९ अन्वये अ क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील उद्यानाचे नुतनीकरण करणेकामी मे.जी.बी. इंटरप्रायजेस या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा निविदा र.रु.३९,२९,५९५/- (अक्षरी र.रू.एकोणचाळीस लाख एकोणतीस हजार पाचशे पंच्याण्णव फक्त) पेक्षा २०.६०% टक्के ३१,२०,०९८/- कमी दराने स्विकृत करणेत आली असुन प्रस्तुतकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९४ विषय क्रमांक - ३३

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/१२२/२०१८ दि.२०/०७/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०२.०७.२०१८ ते दि.०८.०७.२०१८ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा

परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१२२/२०१८ दि.२०/०७/२०१८ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९५ विषय क्रमांक - ३४

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.मसाभा/२/कावि/६२०/२०१८ दि.२१/०७/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैदयकिय विभागाअंतर्गत रष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी ई-निविदा क्र.१५/२०१५-१६ मध्ये १३ टाटा सुमो अथवा तत्सम खाजगी वाहने भाडे तत्वावर घेण्यात आली आहेत यामध्ये प्रति वाहन प्रति दिन प्रति ६० कि.मी.साठी र.रु.१५००/- व त्यापुढील प्रत्येक किमीसाठी र.रु.८.५० असे लघुत्तम दर दोन वर्षाकरिता प्राप्त झालेले आहेत त्याची मुदत दिनांक ०५/०८/२०१८ रोजी संपत आहे. तरी मे.ओम एंटरप्राईजेस यांना पुढील ३ महिने किवा ई-निविदा प्रकिया पुर्ण होईपर्यत मुदतवाढ देणे आवश्यक आहे. एकुण ३ महिन्याकरिता अंदाजे र.रु.१५,५०,०००/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक -२९९६ विषय क्रमांक - ३५

दिनांक – २५/०७/२०१८ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पापु/६/कावि/६७/२०१८ दि.२४/७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

पाणीपुरवठा विभागाकडील ई-निविदा क्र.२/१/२०१८-१९ अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.२३ करीता १६४१ मे.टन द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड खरेदीकामी वृत्तपत्र तसेच मनपा वेबसाईटवर निविदा नोटीस प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा अटी व शर्तीनुसार पात्र असलेल्या ०३ निविदा दि.२५/०६/२०१८ रोजी निविदा समितीपुढे उघडल्या असून दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

---

| ठेकेदार | प्राप्त निविदा दर रू. |
|---|---|
| १) मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन | ११,१००/- प्र.मे.टन<br>(सुधारित दर र.रु.११,०००/- प्र.मे.टन)<br>(निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ३.७२% ने कमी) |
| २) मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. | ११,२१५/- प्र.मे.टन |
| ३) मे.जी.एस. कमर्शिअल कॉर्पोरेशन | १२,४००/- प्र.मे.टन |

---

वरीलपैकी मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांची र.रू.११,०००/- प्र.मे.टन दराची निविदा लघुत्तम निविदा आहे. जलशुद्धीकरणाचे प्रक्रियेमध्ये द्रवरूप पॉली अॅल्युमिनियम क्लोराईड हा घटक अत्यंत महत्वाचा असून त्याचा पुरवठा न चुकता अखंडीतपणे जलशुद्धीकरण केंद्रास होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा त्याचा शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होवू शकतो. यासाठी सदर पुरवठ्याकामी एकावेळी २ एजन्सीज मनपाचे हाताशी असने गरजेचे असलेने सदर निविदेतील शर्त क्र.१२ नुसार सदरची खरेदी 60:40 या प्रमाणात म्हणजेच 1st Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या 60% व 2nd Lowest ठेकेदाराकडून एकूण परिमाणाच्या 40% परिमाण 1st Lowest ठेकेदाराच्या दराने खरेदी करावयाचे आहे. तरी, 1st Lowest ठेकेदार मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून एकूण परिमाणाच्या ६०% परिमाण म्हणजेच ९८५ मे.टन द्रवरूप पॉली अॅल्युमिनियम क्लोराईड र.रु.११,०००/- प्र.मे.टन दराने (एकूण खर्च र.रू.१,०८,३५,०००/-) दराने खरेदी करणेस मा.आयुक्त यांनी दि.२३/०७/२०१८ चे प्रस्तावान्वये मंजूरी दिलेली आहे. तरी मे.एस.व्ही.एस. केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून ९८५ मे.टन द्रवरूप पॉली अॅल्युमिनियम क्लोराईड र.रू.११,०००/- प्र.मे.टन (निविदा स्विकृती योग्य दरापेक्षा ३.७२% ने कमी) या दराने खरेदी करणेसाठी त्यांच्याशी करारनामा करणेस व याकामी येणारा एकूण खर्च र.रू.१,०८,३५,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी आठ लाख पस्तीस हजार फक्त) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९७ विषय क्रमांक - ३६
दिनांक – २५/०७/२०१८ विभाग - दुरसंचार
सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील पत्र क्र.दूरसंचार/३/कावि/५०/२०१८ दि.२४/७/२०१८
मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

अग्निशामक विभागाचे वाढते कार्यक्षेत्र विचारात घेता मनपास ड्यूप्लेक्स वायरलेस फ्रिक्वेंसीची आवश्यकता आहे. ड्यूप्लेक्स वायरलेस फ्रिक्वेंसी घेतलेस लांब पल्यांचे संदेश दळण-वळण रिपीटर यंत्रणा उभारून करणे शक्य आहे. त्याकामी केंद्रसरकारचे संचार मंत्रालय, नवी दिल्ली यांस र.रू.२,२०,५००/- (अक्षरी र.रू. दोन लाख वीस हजार पाचशे फक्त) एवढी रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९८ विषय क्रमांक - ३७
दिनांक – २५/०७/२०१८
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.विकास डोळस, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव -

केंद्र शासनाच्या वतीने स्वच्छ भारत अभियानाविषयी सेमिनारचे इंदोर, मध्यप्रदेश येथे दि.९/४/२०१८ ते १२/४/२०१८ या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. सदर सेमिनारचे निमंत्रण महापौर यांना प्राप्त झाले होते. त्यानुसार पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने महापौर हे केंद्र सरकारच्या वतीने स्वच्छ भारत अभियानाविषयी सेमिनारला इंदोर, मध्यप्रदेश येथे उपस्थित राहिले होते. पिंपरी चिंचवड महापालिकेने केलेल्या विविध विकास कामांची ख्याती देश विदेश पातळीवर पोहोचलेली असून, शहराचा नुकताच स्मार्ट सिटीमध्ये समावेश झाला आहे. सदर सेमिनारमध्ये स्वच्छ अभियान विषयक नियोजन, विकासकामे, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण इ. बाबत चर्चासत्र, प्रदर्शन आणि प्रात्यक्षिके या ठिकाणी आयोजित करणेत आली होती. पिंपरी चिंचवड शहरातील भविष्यकाळातील आरोग्य, पर्यावरण व स्वच्छता विषयक कामे आणि सुविधांच्या नियोजनांच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या दृष्टीने ही परिषद उपयुक्त ठरली आहे. मा.महापौर यांचा विमानप्रवास, निवास, चहा, नाश्ता, भोजन, स्थानिक प्रवास, व इतर अनुषंगिक बाबींकामी पॅकेज टूर स्वरूपात दौ-यांचे आयोजन मे.व्हीजन हॉलीडेज, प्राधिकरण, निगडी – ४४ यांचे मार्फत करण्यात आले होते. त्याकामी एकूण र.रू.५४,४५०/- (अक्षरी र.रू.चौपन्न हजार चारशे पन्नास फक्त) थेट पध्दतीने झालेल्या खर्चास आणि त्याचे बिल मे.व्हीजन हॉलिडेज, प्राधिकरण यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२९९९ विषय क्रमांक - ३८

दिनांक – २५/०७/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन महानगरपालिकेच्या वतीने करणेस व त्यांसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३००० विषय क्रमांक - ३९

दिनांक – २५/०७/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात बलिदान देऊन सर्व भारतीयांसाठी प्रेरणादायी असणा-या क्रांतीवीर चापेकर बंधुंचे राष्ट्रीय संग्रहालय उभारणीचे काम महानगरपालिकेच्या वतीने करणेत येत आहे. त्यांच्या दि.२३/४/२०१८ च्या भूमीपूजन समारंभासाठीच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -३००१ विषय क्रमांक - ४०

दिनांक – २५/०७/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकिय विभागाकडून विविध प्रकारचे खरेदी केली जाते. वैद्यकिय विभागाचे प्रमुख आरोग्य वैद्यकिय अधिकारी यापुढे त्यांचे सर्व आर्थिक अधिकार (म्हणजे निविदा मागविणे निविदे संदर्भातील प्री-बिड मिटींग करणे, निविदा उघडणे, निविदा मंजूर प्रक्रिया करणे, करारनामा करणे, कामाचा आदेश देणे इ.) असे सर्व आर्थिक अधिकार काढण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच हे काढलेले वरील प्रमाणे सर्व आर्थिक अधिकार अति.आयुक्त १ यांचेकडे देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/९५१/२०१८
दिनांक - २७/०७/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.स्था/नि/क-मुख्य/कावि/१२८/२०१८ दि.१६/७/२०१८ विषय क्र.७ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य ह मुख्यालय
क्र.स्था/नि/क-मुख्य/१२८/२०१८
दि.१६/०७/२०१८

प्रपत्र अ ( १ ते १ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ए एफ मंजाळकर | ५३/४२/२०१७-१८ | प्रभाग क्र. ६१ दापोडी परिसरातील ताब्यात येणारे रस्ते खडीकरण करणे | १८/०६/२०१८ | स्था/नि/क-मुख्य/१४६/२०१८ | ०४/०७/२०१८ | १२,००,००० | १०.१० % कमी | १०,७८,८०० |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

(क्र.इक्षेका/३/कावि/४२२/२०१८ दि.१६/७/२०१८ विषय क्र.१४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी -17
(विषयपत्र क्र.डक्षेका/3/कावि/ ५२२/2018 दि. १६/ ०७/2018 लगत)

प्रपत्र "अ"

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मे. श्री वेंकटेश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट सोलुशन प्रा. लि. | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/10/1/2017 -2018 | ड प्रभाग अंतर्गत सर्व मनपा इमारतीत वातानुकुलन यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे | 08/06/2018 | डक्षेका/03/कावि/392/2018 | 28/06/2018 | 265912 | -10.00% कमी | 239321 |
| 2 | मे. श्रीया इलेक्ट्रीकल्स | विद्युत/ड प्रभाग/Prabhag/10/2/2017 -2018 | ड प्रभाग इमारतीच्या उद्वाहकची देखभाल दुरुस्ती करणे. | 22/06/2018 | डक्षेका/03/कावि/416/2018 | 07/07/2018 | 283993 | -1.00% कमी | 281153 |
| | एकुण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 520474 |

कार्यकारी अभियंता (वि)
ड क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
रहाटणी 17.

D:\Shri Ghadge (MP Data\Ganesh\विद्युत विभाग\2017 18\Docket Elec\Nagarsachiv Docet - Elec 6.doc

# (क्र.पापु/६/कावि/५०/२०१८ दि.१८/७/२०१८ विषय क्र.१८ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
पाणी पुरवठा विभाग
क्र.पापु/६/कावि / ५० /२०१८
दि. १८ /०७/२०१८

प्रपत्र अ ( १ ते ७ )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा ओदशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | मे. जीवनधारा टयूबवेल कंपनी | १२/६/२०१७-१८ | सन २०१६ - १७ साठी जलशेत्र क्र ड /१ ते ड / १५ मधील परिसरात आवश्यकतेनुसार बोअरवेल घेणे. | २८/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३८८/२०१८ | १५/०६/२०१८ | ७,७०,३०५/-- | ५.०० % जादा | ८,०८,८२०/- |
| २ | मे. महाराष्ट्र अंडर वॉटर सर्व्हिसेस | २५/२१/२०१७-१८ | अशुद्ध जलउपसा केंद्र रावेत येथील टप्पा क्र. 1 ते 4 चे संपमधील गाळ काढणे. | ०७/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३९९/२०१८ | १४/०६/२०१८ | १८,२३,२५०/- | ३.०० % कमी | १७,६८,५५२/- |
| ३ | मे. एच. एम. कन्स्ट्रक्शन | ३१/१/२०१७-१८ | सन २०१७-१८ करिता जलक्षेत्र क्र. ड/१२ मधील पिंपळे गुरव येथील पाण्याच्या टाकीचे रंगसफेदी करणे व स्थापत्यविषयक कामे करणे. | १९/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३७३/२०१८ | ०१/०६/२०१८ | २२,४९,९९५/- | १८.१८ % कमी | १८,४०,९४५/- |
| ४ | मे. श्री कॉन्ट्रॅक्टर | ३१/५/२०१७-१८ | सन २०१७-१८ करिता वैदूवस्ती मध्ये ठिकठिकाणी व्हाल्व चेंबर बांधणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे | १६/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३९२/२०१८ | १५/०६/२०१८ | १६,८०,६१४/- | २५.५२ % कमी | १२,५१,७२१/- |
| ५ | मे. जीवनधारा ट्यूबवेल कंपनी | ३१/८/२०१७-१८ | फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार बोअरवेल्स घेणे. व दूरुस्ती करणे | २८/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३८७/२०१८ | १४/०६/२०१८ | १८,२०,४१४ | ५.०० % जादा | १९,११,४३४/- |
| [illegible] | मे. मोरया एंटरप्रायझेस | ३१/१७/२०१७-१८ | सन २०१७-१८ करिता पिंपळे सौदागर मध्ये ठिकठिकाणी व्हाल्व चेंबर बांधणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे | १६/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३९३/२०१८ | १५/०६/२०१८ | १६,८०,६१४/- | २५.५२ % कमी | १२,५१,७२१/- |
| ७ | मे. जीवनधारा ट्यूबवेल कंपनी | ३१/१९/२०१७-१८ | ब मुख्यालय अंतर्गत सन २०१६-१७ साठी जलक्षेत्र क्र.बी।२ ते बी।८ मध्ये नवीन बोअरवेल घेणे व देखभाल दुरुस्ती करणे | २८/०५/२०१८ | पापु/६/कावि/१३८९/२०१८ | १५/०६/२०१८ | २३,३३,८७०/- | ५.०० % जादा | २४,५०,५६३/- |
| | | | | | | एकूण र. रु. | १२३,५९०६२/ | | ११२,८३,३०६/ |

सह शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क्र.अक्षेका/आ/२/कावि/३६७/२०१८ दि.१८/७/२०१८ विषय क्र.२१ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभाग
विषय पत्र क्र.अक्षेका/आ/२/कावि/३६७/२०१८ दि.१८/०७/२०१८
प्रपत्र अ

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारीख | कामाचा आदेश क्रमाक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.सेक्युअर आयटी फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे | ३/२०१८-१९ आरोग्य | श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्या २०१८ साठी पोर्टेबल टॉयलेट उपलब्ध करणे | दि.११/७/२०१८ | क्र.अक्षेका/आ/२/कावि/३३०/२०१८ | दि.४/७/२०१८ | र.रु.८,४९,६००/- | १६.५३% जादा | र.रु.९,९०,०००/- |

क्षेत्रीय अधिकारी
अ क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी ४४